# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.
दूरध्वनी ०२१७- ०२७४०३००
( आयक्त कार्यालय. Email :-smccommissioner@yahoo.com)


जा.क्र. नआ/वै/पदभरती-23/नियुक्ती आदेश/केमिस्ट/ ५५५ दि.१५/03/2024, E- 232452

**वाचा :-** 1. क्र. प्रानिमं 1222/प्र.क्र.136/का.13-अ, दि.21/11/2022 रोजीचे शासन निर्णय
2. क्र.सोमपा-2023/प्र.क्र.47/निव-18, दि.14/02/2023 रोजीचे नवि-18,चे पत्र.
3. सआस/कक्ष-1/आस्था-1/100, दि.05/06/2023 रोजीने शासनास पत्र.
4. जा.क्र.नआ/वै/सरळसेवा पदभरती जाहीरात/340, दि.09/11/2023 ची जाहीरात
5. जा.क्र.नआ/वै/पदभरती जाहीरात/शुध्दीपत्रक-1/351, दि.22/11/2023 चे शुध्दीपत्रक
6. जा.क्र.नआ/वै/पदभरती जाहीरात/शुध्दीपत्रक-1/358, दि.29/11/2023 चे शुध्दीपत्रक
7. जा.क्र.नआ/वै/पदभरती जाहीरात/शुध्दीपत्रक-1/371, दि.06/12/2023 चे शुध्दीपत्रक
8. जा.क्र.नआ/वै/सरळसेवा पदभरती जाहीरात/385, दि.15/12/2023 ची जाहीरात
9. जा.क्र.नआ/वै/पदभरती जाहीरात/शुध्दीपत्रक-4/387, दि.20/12/2023 चे शुध्दीपत्रक
10. जा.क्र.नआ/वै/04 पोस्ट/गुण प्रसिध्दी/532, दि.06/03/2024
11. जा.क्र.नआ/वै/04 पोस्ट/निवड यादी/539,दि.12/03/2024 ने तात्पु.निवड व प्रतिक्षायादी प्रसिध्दीपत्रक
12 जा.क्र.नआ/वै/04 पोस्ट/निवड यादी/540, दि.12/03/2024 ने दस्तऐवज तपासणी प्रसिध्दीपत्रक
13. मा.सरळसेवा पदभरती निवड समितीचे दि.15/03/2024 रोजीचे इतिवृत्त.

## -: नियुक्ती आदेश :-

ज्याअर्थी सोलापूर महानगरपालिकेकडून संदर्भ क्र. 4 व 8 ने जाहीर प्रसिध्दकरण करून वर्ग-अ (अराजपत्रित) ते वर्ग-ड मधील आस्थापनेवरील विविध 31 संवर्गामधून एकूण 302 पदे भरण्याबाबतची पदभरती जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने त्यांची ऑनलाईन परीक्षा दि.15/02/2024 ते दि.17/02/2024 या कालावधीत घेण्यात आलेली असून त्याबाबतचा निकाल संदर्भ क्र.11 ने सामाजिक व समांतर आरक्षणानुसार गुण प्रसिध्द करून दस्तऐवज पडताळणी, वैद्यकिय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणीचे अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात निवड व प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यात आलेली होती.

ज्याअर्थी निवडीत उमेदवारांची दस्तऐवज तपासणी करण्याकरीता संदर्भ क्र.12 ने प्रसिध्दपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते. त्यास अनुसरून आलेल्या दस्तऐवजाची तपासणी होवून त्याबाबतचा अंतिम निर्णय संदर्भ क्र.13 ने मा.सेवकवर्ग निवड समितीमध्ये घेण्यात आलेला आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.13 चे निर्णयानुसार खालील तक्त्यात नमूद उमेदवारांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयाकडे रिक्त असलेल्या **केमिस्ट या पदी दि.**15/03/2024 पासून प्रथम दोन वर्षे परिविक्षा कालावधीकरीता सातवे वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी S-10, वेतन बँड- 29200-93300 मधील मनपाचे दि.10/07/2023 रोजीचे परिपत्रकानुसार र.रू.29200/- यावर तदनंतर पदाची नियमित वेतनश्रेणीवर खालील शर्ती व अटीवर नियुक्ती करणेत येत आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | जात प्रवर्ग | नियुक्ती कार्यालय | सातवे वेतन आयोगातील एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | वैभव प्रभाकर शिंदे | अनु.जाती | सार्वजनिक आरोग्य अभियंता | र.रू.29200/- प्रति माह. |

अटी /शर्ती :-

1. नियुक्त उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या पदावर सदर आदेशाच्या दिनांकापासून 10 दिवसांचे आत स्वखर्चाने हजर होणेचे आहे. त्यांची जेष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली 2021 मधील तरतूदीनुसार राहील व जे उमेदवार विहीत मुदतीत नियुक्त पदावर हजर होणार नाहीत ते त्यांची एकत्रित निवडसूचीतील जेष्ठता गमावणेस पात्र राहतील.

2. नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी ते अन्यत्र नोकरी करीत असल्यास त्या पदाचा राजीनामा देणे व सक्षम प्राधिका-याने राजीनामा स्विकृत केल्याबाबतचे आदेश / पत्र रुजू अहवालासोबत सादर करणे आवश्यक आहे.

3. शासन निर्णय मधील तरतूदीनुसार, ज्या उमेदवाराची निवड अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विमुक्त भटक्या जाती, जमाती (अ,ब,क,ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे अशा उमेदवारांची नियुक्ती ही सक्षम प्राधिका-याकडून जातीचे प्रमाणपत्र पडताळणीस अधिन राहून असेल. अशा प्रवर्गानुसार नियुक्त उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत, जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करून तो सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील. त्याकामी आवश्यक विहीत कागदपत्रासह प्रस्ताव उमेदवाराने कार्यालय प्रमुख यांचेकडे 1 महिन्याच्या मुदतीत सादर करावा. जर उमेदवाराने विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर, त्यांच्या सेवा समाप्त करणेत येतील. तसेच ज्या उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडून अवैध ठरविणेत येईल, त्या उमेदवाराचे नियुक्ती महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी- 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, 12 डिसेंबर 2011 मधील तरतुदीनुसार आदेश तात्काळ रदद करणेत येतील व त्यांना सेवेतून कमी करणेत येईल. त्याकरिता कोणतीही पूर्वसूचना दिली जाणार नाही. तसेच संबंधीत उमेदवाराविरुध्द नियमानुसार कारवाई करणेत येईल.

4. खुल्या प्रवर्गातून निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारास त्यांच्या मूळ जातीच्या प्रवर्गाचा फायदा सेवा ज्येष्ठता/पदोन्नतीकरिता घ्यावयाचा असल्यास सदर उमेदवारांनी नियुक्तीपासून 6 महिन्याच्या आत मूळ जातीचे वैधता प्रमाणपत्र संबंधीत कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

5. वरील उमेदवारांची नियुक्ती ही त्यांचे पूर्वचारित्र्य, वर्तणूक अहवालाचे अधीन राहून करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडील परिपत्रक क्र. व्हिसीए-1060डी दिनांक 27/9/1960 नुसार उमेदवार यांचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य बाबतचा अहवाल समाधानकारक असल्याचे आढळून आले नाही तर सा.प्रविभागाकडील शासन निर्णय क्र. चापअ 1012/प्र.क्र.63/16अ दि.26/8/2014 नुसार कार्यवाही करून त्यांची सेवा पूर्व सूचना न देता तात्काळ संपूष्टात आणली जाईल.

6. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक आरटीआर-1403/84/प्र.क्र.54/03/13 दिनांक 10/5/2005, मधील तरतूदीनुसार गट क मधील पदावर नियुक्तीचे दिनांकापासून 2 वर्षाचे आत शासनाने वेळोवेळी विहीत केलेली संगणक अर्हता धारण करणे बंधनकारक आहे. त्यानुसार सदर आदेशातील नमूद उमेदवारांनी नियुक्ती पासून 2 वर्षाच्या आत विहीत संगणक अर्हता धारण केलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणेच्या आधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. विहीत मुदतीत अर्हता धारण न केल्यास संबंधीत उमेदवारांस कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून तात्काळ कमी केले जाईल.

7. नियुक्त केलेल्या उमेदवारांनी शासकीय नियमानुसार हिंदी, मराठी भाषा जर पुर्वी उत्तीर्ण केली नसल्यास किंवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात आलेली नसेल तर त्याने / तिने सदर परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.निम्नस्तर परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता 2 वर्षे मुदत देण्यात आलेली आहे.सदर परीक्षा उत्तीर्ण झालेवर उच्चस्तरीय परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता 2 वर्षाची मुदत देण्यात आलेली आहे.विहित मुदतीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास, उक्त कालावधी समाप्त झालेनंतर,अशी एक किंवा यथास्थिती दोन्ही परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात येईपर्यंत त्यांच्या वेतनवाढी रोखण्यात येतील.

8. या आदेशान्वये नियुक्तीचे पदावर हजर होण्यासाठी उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय होणार नाही .

9. उमेदवारांना दिलेली नेमणूक ही पूर्णतः तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपाची असून नियुक्त पदासाठीची अर्हता तसेच त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यतेच्या अधीन राहून निवड करण्यात आलेली आहे. सदर कागदपत्र /प्रमाणपत्र बनावट, खोटे असल्याचे आढळून आल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्याचे नियुक्ती प्राधिका-याचे अधिकार अबाधित राहतील.

10. माजी सैनिक,प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त,अंशकालीन व दिव्यांग या समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही आरक्षणाकरिता उमेदवाराने सादर केलेल्या समांतर आरक्षणाबाबतच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून असेल.सदर पडताळणीत उमेदवार अपात्र झाल्यास त्याची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

11. इतर मागास वर्ग,सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती,भटक्या जाती,जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 31/01/2020 मधील तरतुदीनुसार,खुल्या प्रवर्गातील, महिला, वि.जा.,भ.ज.,इ.मा.व, व वि.मा.प्रवर्गातील व्यक्ती, शैक्षिणिक व सामाजीकदृष्ट्या मागास प्रवर्ग आणि या प्रवर्गात समाविष्ट मराठा समाज आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्ग या प्रवर्गातील प्रगत व उन्नत गटात समाविष्ट नसलेल्या व्यक्तींना सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या NCL प्रमाणपत्राच्या पडताळणीचे अधीन राहून नियुक्ती असेल. सदर पडताळणीस उमेदवार अपात्र झाल्यास त्याची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

12. अनाथ या समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही महिला व बालविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 02/04/2018 मधील तरतुदीनुसार,अनाथ प्रमाणपत्राची फेरतपासणी अहवालाचे अधीन राहून देण्यात येत आहे. सदर तपासणीस उमेदवार अपात्र झाल्यास त्याची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

13. खेळाडू या समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 30/06/2022 मधील तरतुदीनुसार खेळाडू उमेदवारांची क्रिडा प्रमाणपत्रे मा.आयुक्त,क्रिडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून पुर्नपडताळणीच्या निर्णयास अधीन राहून असेल.

14. या आदेशान्वये नियुक्त उमेदवारास सेवेत रुजू झाल्यापासून दोन वर्षाचे अवधीकरीता विभागाबाहेरील नोकरीकामी कोणत्याही पदाकरीता पूर्व मान्यतेशिवाय अर्ज करता येणार नाही .

15. सोलापूर महानगरपालिकेमध्ये उमेदवार सेवेत रुजू झालेपासून कमीत कमी 5 वर्षे सेवा झालेशिवाय अन्य विभागामध्ये सेवा समावेशन करणेबाबत उमेदवारांना अर्ज करता येणार नाही .

16. उमेदवार शासकीय सेवक या नात्याने कार्यरत असताना दैनंदिन कामकाजात त्यांचेकडून एखादे बेकायदेशीर कृत्य केल्यास कोणतेही कारण व नोटीस न देता त्यांची सेवा शासन नियमानुसार संपुष्टात आणणेत येईल.

17. महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही 1092/1033/प्र.क्र. 22/92/8 दि. 2/12/1997 नुसार उमेदवार शासकीय सेवेत रूजू झालेनंतर त्यांना जर शासकीय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल , तर शासन नियमानुसार एक महिन्याची आगाऊ सुचना (नोटीस) नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे द्यावी लागेल किंवा एक महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम मनपाकडे जमा करावी लागेल .

18. शासन नियमानुसार उमेदवार यांना कोणत्याही राजकीय कार्याशी , संस्थांशी संबंध ठेवता येणार नाही तसे आढळलेस त्यांना शासकीय सेवेतून तात्काळ कोणतीही पूर्वसूचना न देता काढून टाकणेत येईल .

19. या विभागातील कर्मचा-यांकरीता वेळोवेळी जे नियम करण्यात आले आहे/ करणेत येतील ते सर्व नियम रूजू होणा-या कर्मचा-यांवर बंधनकारक राहतील या नियमांची माहिती करून घेणेचे दायित्व विभागाच्या प्रत्येक कर्मचारी यांचेवर राहील.

20. शासन नियमानुसार ठरविलेल्या व ठरविणेत येणा-या सर्व प्रकारचे शासकीय कामकाज तसेच दिलेली जबाबदारी विहीत वेळेत पार पाडणे उमेदवारास बंधनकारक राहील.

21. नियुक्त पदावर रूजु झालेनंतर प्रथम दोन वर्ष हे परिविक्षाधीन कालावधीचे राहील व सदर परिविक्षाधिन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण करणे आवश्यक राहील. जर उमेदवारांनी परिविक्षाधिन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण केला नाही अथवा त्या पदावर काम करण्यास योग्य नसल्याचे आढळून आल्यास त्यांच्या परिविक्षा कालावधी एक वर्षापर्यंत वाढविण्यात येईल. तदनंतर वाढीव कालावधीतही काम समाधानकारक नसल्यास अशा उमेदवारांची सेवा समाप्तीस पात्र राहील.

22. उपरोक्त आदेशात बदल करणेकामी उमेदवारांकडून शासकीय/ अशासकीय/राजकीय व्यक्तीव्दारे, तोंडी अथवा लेखी, प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष दबाव तंत्राचा वापर केल्यास सदरचा नियुक्ती आदेश कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द केला जाईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

23. उमेदवारांने सेवेत रूजु झाल्यानंतर नियमाप्रमाणे प्राप्त होणा-या तीन संधीमध्ये खात्याची सेवा प्रवेशोत्तर परीक्षा (लागू असल्यास) उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी या करीता चार संधी देय आहेत. विहित संधीमध्ये उत्तीर्ण न झालेले कर्मचारी वेतनवाढ रोखण्यास पात्र होतील तसेच सेवाजेष्ठता यादीमध्ये जेष्ठता गमावणेस पात्र होतील.

24. शासन निर्णयातील तरतुदीनुसार दोन महिन्यांच्या आत मत्ता व दायीत्व (Assets & Liabilities) बाबतची पत्र /विवरणपत्र कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील. विवरणपत्र विहीत मुदतीत सादर न केल्यास सदर कर्मचा-याविरूध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियमांतर्गत शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल.

25. सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सदर नियुक्तीचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात / मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्याय प्राधिकरणाकडे अथवा अन्य सक्षम न्यायालयात दावा दाखल असल्यास अथवा करण्यात आल्यास त्या दाव्याच्या अंतिम निर्णयास सदर नियुक्ती बंधनकारक राहील.

26. उपरोक्त नियुक्त कर्मचाऱ्यास शासन निर्णय क्र.अनियो-105/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 मधील तरतूदीनुसार नविन परिभाषित अशंदान निवृत्ती योजना लागू राहिल. याशिवाय शासनाकडून याबाबत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय लागू राहतील.

27. नियुक्ती पदावर हजर होताना शासन निर्णय दि.1 जुलै 2005 नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील तरतूदीनुसार उमेदवारास लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर बाबत भविष्यात माहिती खोटी/चुकीची आढळून आलेस संबंधीतांना शासकीय सेवेतून तात्काळ कोणतीही पूर्वसूचना न देता काढून टाकणेत येईल .

15.03.2024

( शीतल तेली-उगले, भा.प्र.से. )
आयुक्त ,
सोलापूर महानगरपालिका,

**प्रती,**
श्री. वैभव प्रभाकर शिंदे,
सोमेश्वर सृष्टी बँक कॉलनी, जिरेवाडी, बंगलो नं.12,
परळी वैजीनाथ, जिल्हा-बीड.
मो.- 8169868871

**प्रत :-**

1. मुख्यलेखापाल कार्यालय
2. संगणक विभाग
3. सेवापुस्तक विभाग / आस्था-4, सा.प्र.वि.
4. अंतर्गत लेखापरिक्षक
5. संबंधित विभाग
6. स्थळप्रत

**प्रत :-**

1. नगर विकास विभाग,नवि-2, मंत्रालय,, मुंबई. यांचेकडे माहितीस्तव सादर..